मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पुणे ग्रॅंड टूर 2026चा अंतिम टप्पा पिंपरी-चिंचवडमधून; शहर सज्ज

## 99 किमी आंतरराष्ट्रीय सायकल शर्यतीसाठी रस्ते सुशोभिकरण, वाहतूक व सुरक्षेची व्यापक तयारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे ग्रॅंड टूर - 2026 या प्रतिष्ठेच्या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचा अंतिम आणि निर्णायक टप्पा शुक्रवारी (दि. 23) पिंपरी-चिंचवड शहरातून पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत आंतरराष्ट्रीय सायकलिंग महासंघाच्या निकषांनुसार व्यापक व काटेकोर तयारी पूर्ण करण्यात आली आहे. शर्यत मार्गाचे आकर्षक सुशोभिकरण करण्यात आले आहे.

स्पर्धेतील प्रमुख टप्पा म्हाळुंगे-बालेवाडी श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथून दुपारी 1.30 ला सुरू होणार आहे. पुणे शहरातील विविध मार्गांवरून जात हा टप्पा जंगली महाराज रोडवरील बालगंधर्व रंगमंदिर येथे दुपारी चारला होणार आहे. अंतिम टप्प्याचे एकूण अंतर 99.15 किलोमीटर आहे.



### भित्तिचित्रांतून क्रीडा आणि संस्कृतीचा संगम

» या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेनिमित्त पिंपरी-चिंचवड शहरात ठिकठिकाणी क्रीडा, सायकलिंग, महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा व विविध खेळांतील दिग्गजांचे दर्शन घडवणारी आकर्षक भित्तिचित्रे साकारण्यात आली. आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या सौंदर्यीकरण उपक्रमामुळे शहरात क्रीडा उत्सवाचे वातावरण निर्माण झाले.

ही स्पर्धा औंध येथील राजीव गांधी पूल, काळेवाडी फाटा, रावेतमधील बास्केट बिज, आकुर्डीतील डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालय, निगडी येथील भक्ती-शक्ती समुह शिल्प चौक, त्रिवेणीनगर चौक, दुर्गानगर चौक, इंद्रायणी नगर चौक, संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, भोसरी डिस्ट्रिक्ट सेंटर, स्पाईन रोड, जुना आरटीओ रस्ता, आयुक्त बंगला, एम्पायर इस्टेट उड्डाण पुल अशा महत्त्वाच्या मार्गांवरून मार्गक्रमण करणार आहे. या माध्यमातून पुणे व पिंपरी-चिंचवडमधील विविध भाग एकाच आंतरराष्ट्रीय क्रीडा व्यासपीठावर एकत्र येणार आहेत.

### आंतरराष्ट्रीय निकषांनुसार शहराची तयारी

» स्पर्धेच्या अनुषंगाने महापालिकेमार्फत रस्त्यांचे डांबरीकरण, पदपथ दुरुस्ती, गतिरोधक हटविणे, चेंबर्स समपातळीवर आणणे, बीआरटी रेलिंगची दुरुस्ती व रंगरंगोटी, पुलांचे सुशोभीकरण, थर्मोप्लास्टिक पेंटिंग, चौकांचे सौंदर्यीकरण, विद्युत व्यवस्था सुधारणा तसेच, संपूर्ण मार्गाची विशेष साफसफाई करण्यात आली आहे. पदपथ, कठडे धुवून घेण्यात आले आहेत. मार्गावरील बेवारस वाहने हटविणे, वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पर्यायी मार्गांची आखणी, सुरक्षा व्यवस्था, वैद्यकीय व आपत्कालीन सेवा यांचेही सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. राडारोडा व माती असलेल्या ठिकाणे पडदा लावून झाकण्यात आली आहेत. काही कालावधीसाठी आवश्यक त्या ठिकाणी वाहतूक वळविण्यात येणार असून, नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

---

# पिंपरी चिंचवडसाठी ऐतिहासिक व अभिमानाचा क्षण; अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचे लोकार्पण

## शहराला आता स्वतःचे हक्काचे "अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय" लाभत आहे, या न्यायालयाचे भव्य लोकार्पण सोहळा रविवार, दिनांक 25 जानेवारी 2026 रोजी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासाच्या आणि सक्षम न्यायव्यवस्थेच्या दिशेने एक अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले जात असून, शहराला आता स्वतःचे हक्काचे "अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय" लाभत आहे. या न्यायालयाचे भव्य लोकार्पण सोहळा रविवार, दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी, सकाळी १०.३० वाजता, मोरवाडी येथील जुनी न्यायालयीन इमारत येथे मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश संदीप मारणे साहेब व आसिफ डॉक्टर साहेब यांच्या हस्ते तर पुणे जिल्ह्याचे प्रमुख न्यायाधीश एम.के. महाजन साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.




पिंपरी चिंचवडसारख्या वेगाने वाढणाऱ्या औद्योगिक व लोकसंख्येच्या शहरासाठी स्वतंत्र अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाची आवश्यकता दीर्घकाळापासून जाणवत होती. या न्यायालयाच्या स्थापनेमुळे न्यायप्रक्रिया अधिक गतिमान, सुलभ व प्रभावी होणार असून, नागरिकांना वेळेत आणि सहज न्याय मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

ही केवळ प्रशासकीय घडामोड नसून, शहरातील सर्वसामान्य नागरिक, वकील वर्ग, न्यायालयीन कर्मचारी व संपूर्ण न्यायव्यवस्थेसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. न्यायालयीन कामकाजाचा वाढता भार लक्षात घेता, हे अतिरिक्त न्यायालय नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करणारे आणि लोकाभिमुख न्यायव्यवस्थेचा आदर्श निर्माण करणारे ठरेल.

पिंपरी चिंचवड शहर हे राज्यातील वेगाने विकसित होणाऱ्या औद्योगिक शहरांपैकी एक असून, येथे मोठ्या प्रमाणात औद्योगिक, फौजदारी, दिवाणी तसेच श्रमविषयक प्रकरणांची संख्या सातत्याने वाढत आहे. यामुळे न्यायालयीन कामकाजाचा ताण वाढत होता. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाची स्थापना झाल्याने न्यायप्रक्रिया अधिक वेगवान, कार्यक्षम आणि नागरिकाभिमुख होण्यास निश्चितच मदत होणार आहे.

> जलसंपदा विभागाकडून रावेत येथे नवीन बंधारा बांधण्याबाबत पत्र आले आहे. त्यासाठी ९० कोटी रुपयांची मागणी केली आहे. आयुक्तांची मंजुरी घेऊन जलसंपदा विभागाला कळविले जाईल. बंधारा झाल्यानंतर शहराला तीन दिवस पुरेल इतका पाणीसाठा रावेत येथे उपलब्ध होईल.
>
> - ॲड. उमेश राम खंदारे सचिव, पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशन

# सहा लेन रस्ता, बॅरिकेड्स ओलांडण्याची कसरत

## सांगवी फाटा येथील सहा लेनचा रस्ता ओलांडण्यासाठी पादचारी पूल किंवा भुयारी मार्ग असा कोणताही पर्याय उपलब्ध नाही.

**पिंपरी | प्रतिनिधी**

सांगवी फाटा येथील सहा लेनचा रस्ता ओलांडण्यासाठी पादचारी पूल किंवा भुयारी मार्ग असा कोणताही पर्याय उपलब्ध नाही. येथील कायमस्वरुपी असलेल्या बॅरिकेड्सवरून उड्या मारत नागरिकांना रस्ता ओलांडावा लागत आहे. अनेक वर्षांपासून ही परिस्थिती आहे. पण, आता आंतरराष्ट्रीय सायकल शर्यतीवेळी नागरिकांच्या या समस्येला पुन्हा वाचा फुटली आहे.



“मोठ्या कार्यक्रमांवेळीच नव्हे, तर दररोज आम्हाला अशीच कसरत करावी लागते. अपघात घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का” असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. सांगवी फाटा येथे तातडीने पादचारी पूल किंवा भुयारी मार्ग उभारावा, अशी मागणी नागरिक करत आहेत.

पिंपरी चिंचवड आणि पुणे या शहरांना जोडणारा सांगवी फाटा हा सतत वर्दळीचा चौक आहे. येथे सहा लेनचा मुख्य मार्ग असून, वाहतूक नियंत्रणासाठी मध्यभागी कायमस्वरुपी लोखंडी बॅरिकेड्स लावण्यात आले आहेत. मात्र, पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र आणि सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. दरम्यान, शुक्रवारी (ता. २३) सायकल शर्यत रस्त्याच्या एका बाजूने जाऊन दुसऱ्या बाजूने परतणार होती. त्याचा आनंद घेण्यासाठी प्रेक्षकांना रस्ता ओलांडणे आवश्यक होते. पण, पादचारी पूल किंवा भुयारी मार्ग असा कोणताही पर्याय येथे नव्हता. त्यामुळे नागरिकांनी बॅरिकेड्वर पाय ठेवून, तोल सावरत, उड्या मारून रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला जाण्याचा धोकादायक मार्ग अवलंबला.

या दरम्यान ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी तसेच कामगारांना त्रास सहन करावा लागला. काही नागरिक घसरत होते, तर काहींना वाहनांमधून रस्ता ओलांडावा लागला. अपघाताची भीती असतानाही पर्याय नसल्याने हा बॅरिकेड्सवरून उड्या माराव्या लागल्याचे नागरिकांनी सांगितले.

सांगवी फाटा परिसरातून नवी सांगवी, जुनी सांगवी, पिंपळे गुरव, औंध, पिंपळे सौदागर या भागांकडे मोठ्या प्रमाणात पादचारी वर्दळ असते. बस थांबे, शाळा, रुग्णालये, बाजारपेठा जवळ असल्याने रस्ता ओलांडणे ही नागरिकांची दैनंदिन गरज झाली आहे. मात्र, कायमस्वरुपी बॅरिकेड्स आणि सुरक्षित पादचारी सुविधांचा अभाव यामुळे ही स्थिती धोक्याची ठरत आहे.

“मोठ्या कार्यक्रमांवेळीच नव्हे, तर दररोज आम्हाला अशीच कसरत करावी लागते. अपघात घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का” असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. सांगवी फाटा येथे तातडीने पादचारी पूल किंवा भुयारी मार्ग उभारावा, अशी मागणी नागरिक करत आहेत.

सांगवी फाटा येथील सहा लेनचा रस्ता ओलांडण्यासाठी पादचारी पूल किंवा भुयारी मार्ग असा कोणताही पर्याय उपलब्ध नाही. येथील कायमस्वरुपी असलेल्या बॅरिकेड्सवरून उड्या मारत नागरिकांना रस्ता ओलांडावा लागत आहे. अनेक वर्षांपासून ही परिस्थिती आहे. पण, आता आंतरराष्ट्रीय सायकल शर्यतीवेळी नागरिकांच्या या समस्येला पुन्हा वाचा फुटली आहे.

> **महापालिकेच्या आगामी अर्थसंकल्पात तरतूद करून सांगवी फाटा येथे भुयारी मार्ग निर्माण करण्यात येईल. नजीकच्या भविष्यामध्ये ही सुविधा सुरू करण्याचे नियोजन आहे.**
>
> **- विजय भोजने, कार्यकारी अभियंता (प्रकल्प), पिंपरी चिंचवड महापालिका**

> **सांगवी फाटा येथे पादचारी पूल किंवा भुयारी मार्ग नसल्यामुळे आम्हाला दररोज सहा लेनचा रस्ता आणि बॅरिकेड्सवरून उड्या मारत रस्ता ओलांडावा लागतो. ही अडचण सायकल स्पर्धेवेळी अधिक तीव्र झाली. एखाद्या अपघातानंतरच प्रशासनाला जाग येणार का? नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीने कायमस्वरुपी उपाययोजना आवश्यक आहे.**
>
> **- गणेश जाधव, स्थानिक नागरिक**

# नवा ‘कारभारी’ कोण? महापालिकेतील 85 नगरसेवक दावेदार; उत्सुकता शिगेला

## दिग्गजांनी वरिष्ठ नेत्यांकडे मोर्चेबांधणी सुरु, पक्षांतर्गत बैठकांना वेग आला असून, नावांची जोरदार चर्चा सुरु झाली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे महापौरपद खुले (सर्वसाधारण गट) झाल्याने राजकीय वातावरण तापले आहे. महापालिकेतील सत्ताधारी भाजपच्या ८५ नगरसेवकांपैकी कोणाच्या गळ्यात महापौरपदाची माळ पडणार, याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. दिग्गजांनी वरिष्ठ नेत्यांकडे मोर्चेबांधणी सुरू केली आहे. पक्षांतर्गत बैठकांना वेग आला असून, नावांची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.



महापालिकेच्या स्थापनेपासून १९८२ पासून आतापर्यंत सात महिलांनी तर १९ पुरुषांनी महापौरपद भूषविले आहे. यंदा २७व्या वेळी महापौरपद खुल्या गटासाठी जाहीर झाले आहे. निवडणुकीत भाजपच्या चिन्हावर ८४ तर एका पुरस्कृतासह एकूण ८५ नगरसेवक निवडून आले आहेत. २०१७ मध्ये भाजपची सत्ता आल्यानंतर २०२२पर्यंत आतापर्यंत दोन पुरुष आणि एका महिला नगरसेविकेला महापौरपदाची संधी मिळाली होती

महापालिकेतील ८५ नगरसेवकांपैकी ४२ पुरुष तर पुरस्कृतासह ४३ महिला सदस्या आहेत. भाजपचे माजी महापौर नितीन काळजे, राहुल जाधव यांना यापूर्वी संधी मिळाली आहे. त्यामुळे यांना पुन्हा संधीची शक्यता कमी आहे. निष्ठावंतांपैकी शीतल ऊर्फ विजय शिंदे तिसऱ्यांदा निवडून आले आहेत. त्यामुळे त्यांचे नाव आघाडीवर आहे.

महापौरपदासाठी भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, नितीन लांडगे, सलग दोनदा बिनविरोध निवडून आलेले रवी लांडगे, उपमहापौर तुषार हिंगे, आमदार शंकर जगताप यांचे विश्वासू ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली जगताप, प्रभाग क्रमांक १९ मधील निष्ठावंत मंदार देशपांडे यांच्या नावांची जोरदार चर्चा आहे. महापालिका निवडणुकीआधी भाजपमध्ये आलेले राहुल कलाटे, राजू मिसाळ, प्रशांत शितोळे यांचीही नावे चर्चेत आहेत.

### ‘सर्वसाधारण’मध्ये सर्व प्रवर्ग खुले

» **महापौरपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी असले, तरी सर्वसाधारण महिला, ओबीसी पुरुष-महिला, अनुसूचित जाती-जमाती या प्रवर्गातून निवडून आलेल्या नगरसेवकांनाही महापौरपदाची संधी मिळू शकते. त्यामुळे इच्छुकांची संख्या वाढली असून, अंतिम निर्णयाकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.**

### महिलांनाही संधी देण्याची शक्यता

» **महापौरपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी असले, तरी सर्वसाधारण महिला, ओबीसी पुरुष-महिला, अनुसूचित जाती-जमाती या प्रवर्गातून निवडून आलेल्या नगरसेवकांनाही महापौरपदाची संधी मिळू शकते. त्यामुळे इच्छुकांची संख्या वाढली असून, अंतिम निर्णयाकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.**

# पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात , 'द एलिशियन फिल्ड', 'बाप्या' सर्वोत्कृष्ट?

## 24व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा (पिफ) समारोप बालगंधर्व रंगमंदिरात झाला.

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या आठ दिवसांपासून जगभरातील चित्रपटांची पर्वणी दिलेल्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (पिफ) 'द एलिशियन फिल्ड' हा भारतीय चित्रपट प्रभात उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट पुरस्काराचा मानकरी ठरला, तर संत तुकाराम उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट पुरस्कार 'बाप्या' या चित्रपटाने पटकावला.

पुणे फिल्म फाउंडेशन, महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि दादासाहेब फाळके चित्रनगरी यांच्यातर्फे आयोजित २४व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा (पिफ) समारोप गुरुवारी बालगंधर्व रंगमंदिरात झाला. या वेळी महाराष्ट्र चित्रपट आणि सांस्कृतिक रंगभूमी विकास प्राधिकरणाचे सह-व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजनीकर आणि आंतरराष्ट्रीय परीक्षकांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले.

याच कार्यक्रमात भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेते बिस्वजित चॅटर्जी, ज्येष्ठ अभिनेत्री फरिदा जलाल आणि आशा काळे यांना 'पिफ डिस्टिंग्वीश अॅवॉर्ड', तर ज्येष्ठ व्हायोलिनवादक अमर हलदीपूर यांना संगीत क्षेत्रातील योगदानासाठी 'संगीतकार एस. डी. बर्मन आंतरराष्ट्रीय पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. तर, टाटा मोटर्सचे व्यवस्थापक आनंद आगाशे यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी मुंबई चित्रनगरीच्या दिनदर्शिका आणि डायरीचे प्रकाशन करण्यात आले.

प्रसिद्ध अभिनेते जॅकी श्रॉफ, महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, मोहन आगाशे, सतीश आळेकर, समर नखाते, अभिजित रणदिवे, 'पिफ'चे उपसंचालक विशाल शिंदे, आदिती अक्कलकोटकर आदी उपस्थित होते. चित्रपट निवड समितीमध्ये बी. जयमोहन, पिटर केरेकेस, रिट्टा आल्टो, सिनू रामासामी, सेर्गी कासामीतजाना, येसिम उस्ताओग्लू यांचा समावेश होता.

'गेल्या २४ वर्षांमध्ये पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाने वेगळे स्थान निर्माण केले. या महोत्सवाने राज्याच्या संस्कृतीमध्ये भर घातली. त्यामुळे शासनाकडून 'पिफ'ला सर्वतोपरी मदत करण्यात येईल,' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

पूर्वार्धात निकिता मोघे यांच्या संस्थेतर्फे लोकप्रिय हिंदी आणि मराठी गीतांवर आधारित नृत्याचा कार्यक्रम सादर करण्यात आला. अभिनेत्री श्रीया बुगडे आणि अभिनेते क्षितीज दाते यांनी सूत्रसंचालन केले.




### 'चित्रपट आणि रंगभूमीच्या विकासासाठी राज्य शासनाकडून प्रयत्न

» 'चित्रपट आणि रंगभूमीच्या विकासासाठी राज्य शासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. मराठी चित्रपटांसाठी 'चित्रपताका' सारखा महोत्सव, विद्यार्थ्यांना उत्तमोत्तम सिनेमा पहायला मिळावेत, त्यांना जगभरातील चित्रपटांची माहिती मिळावी यासाठी कार्यशाळा, चर्चासत्रे असे उपक्रम राबविण्यात येतात. चित्रपट निर्मितीसाठी आणि चित्रपटांना पाठिंबा देण्यासाठी शासनाने खूप योजना आणल्या असून, राज्यातील तरुणांनी त्यांचा लाभ घ्यावा,' असे आवाहन साजणीकर यांनी केले.

### आंतरराष्ट्रीय चित्रपट पुरस्कार

- » प्रभात सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट पुरस्कार : द एलिशियन फिल्ड, दिग्दर्शक-प्रदीप कुरबाह
- » प्रभात सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट दिग्दर्शक पुरस्कार : लॉरा वँडेल, (अॅडम्स सेक)
- » ज्यूरी स्पेशल मेन्शन : लॉस्ट लँड, दिग्दर्शक-अकिओ फुजीमोटो

### मराठी चित्रपट पुरस्कार

- » संत तुकाराम सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट : बाप्या, दिग्दर्शक-समीर तिवारी
- » सर्वोत्कृष्ट चित्रपट दिग्दर्शक : संतोष डावखर, (गोंधळ)
- » सर्वोत्कृष्ट चित्रपट अभिनेता : गिरीश कुलकर्णी, (बाप्या)
- » सर्वोत्कृष्ट अभिनेत्री : राजश्री देशपांडे, (बाप्या)
- » सर्वोत्कृष्ट छायाचित्रकार : अमलेंदू चौधरी, (बाप्या)
- » सर्वोत्कृष्ट पटकथा : इरावती कर्णिक, (तो ती आणि फुजी)
- » ज्यूरी स्पेशल मेन्शन : दिग्दर्शक – रवींद्र माणिक जाधव (जीव), अभिनय – ललित प्रभाकर (तो ती आणि फुजी)
- » फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटचा (एफटीआयआय) सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार : शुभम सुमित

---

# ग्रँड सायकल स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर मार्गावरील फ्लेक्स हटविण्याचे आदेश

## आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी पुणे महापालिकेची तातडीची कारवाई; राजकीय शुभेच्छा फ्लेक्सवर प्रश्नचिन्ह

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ग्राँड सायकल स्पर्धेचा महत्त्वाचा टप्पा आज शुक्रवारी (दि.23) पार पडणार असून, या पार्श्वभूमीवर स्पर्धेच्या मार्गावरील अडथळे तत्काळ दूर करण्याचे निर्देश महापालिका प्रशासनाने दिले आहेत. स्पर्धा सुरळीत, सुरक्षित आणि आंतरराष्ट्रीय निकषांनुसार पार पडावी, यासाठी स्पर्धा मार्गावर लावलेले सर्व फ्लेक्स, बॅनर्स आणि जाहिराती तत्काळ हटविण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिले आहेत.

ग्राँड सायकल स्पर्धेला देश-विदेशातून नामवंत सायकलपटू, प्रशिक्षक आणि क्रीडाप्रेमी सहभागी झाले आहेत. त्यामुळे पुण्याची प्रतिमा जागतिक पातळीवर अधोरेखित होणार आहे. या स्पर्धेदरम्यान कोणताही दृश्य किंवा वाहतूक अडथळा निर्माण होऊ नये, तसेच खेळाडूंच्या सुरक्षिततेला धोका पोहोचू नये, यासाठी महापालिकेने विशेष दक्षता घेतली आहे.

स्पर्धा मार्गावर अनेक ठिकाणी राजकीय, सामाजिक तसेच व्यावसायिक स्वरुपाचे फ्लेक्स लावण्यात आले असून, त्यामुळे रस्त्याच्या कडेला अडथळे निर्माण होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्याची दखल घेत अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी संबंधित विभागांना तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. या कारवाईत स्पर्धेच्या मार्गावर येणारे सर्व अनधिकृत फ्लेक्स काढण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, या पार्श्वभूमीवर शहरभर लावण्यात आलेल्या नगरसेवकांच्या 'शुभेच्छा' देणाऱ्या फ्लेक्सवर कारवाई कधी होणार, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. पुणे शहरातील विविध चौक, प्रमुख रस्ते, उड्डाणपूल, प्रवेशद्वार आणि सार्वजनिक ठिकाणी नगरसेवकांच्या वाढदिवस, अभिनंदन, निवडणूक विजय किंवा विविध कार्यक्रमांच्या शुभेच्छांचे मोठ्या प्रमाणावर फ्लेक्स लावलेले दिसून येतात.

तरी ही कारवाई फक्त स्पर्धेपुरती मर्यादित न ठेवता सर्वच अनधिकृत आणि नियमबाह्य फ्लेक्सवर समानपणे होणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. नगरसेवकांच्या शुभेच्छा फ्लेक्सवर कधी आणि कशा प्रकारे कारवाई होणार, याबाबत महापालिका प्रशासनाकडून अद्याप स्पष्ट भूमिका मांडण्यात आलेली नाही.




### कारवाईसाठी स्वतंत्र अधिकारी नेमणार

» शहरातील फ्लेक्सवरील कारवाईबाबत माहिती देताना अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. म्हणाले, 15 क्षेत्रीय कार्यालयांत फ्लेक्सवरील कारवाई तीव करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय 2 ते 3 कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार आहे. हे कर्मचारी रस्त्यांची पाहणी करून फ्लेक्स काढतील. तसेच थकबाकी यासारखे प्रश्न देखील हाताळतील. येत्या काही दिवसांत शहर फ्लेक्समुक्त करण्यासाठी कारवाई तीव करण्यात येणार आहे.

# इंदापूर तालुक्यात सर्वाधिक अर्ज; छाननीनंतर प्रमुख उमेदवारांचे अर्ज वैध

## इंदापूर तालुक्यातून जिल्हा परिषदेच्या गटांसाठी सर्वाधिक 114 अर्ज दाखल झाले

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी तिकिटांचा गोंधळ पाहायला मिळाला. या गोंधळामध्येच ७३ गटांसाठी तब्बल ६४१ उमेदवारी अर्ज दाखल झाले. पंचायत समितीच्या १४६ गणांसाठी १ हजार १६५ अर्ज आले आहेत. गुरुवारी झालेल्या अर्जाच्या छाननीमध्ये किरकोळ अर्ज वगळता प्रमुख उमेदवारांचे अर्ज वैध ठरणार आहे. अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी काही जणांना एबी फॉर्म मिळाले तर काहींना थेट अर्ज दाखल करण्याच्या काही वेळ आधीच एबी फॉर्म दिले गेल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. शिरूरमध्ये इच्छुक उमेदवार, समर्थक व कार्यकर्त्यांची अचानक झालेली गर्दी, धक्काबुक्की आणि गोंधळामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

७३ गटांसाठी तब्बल ६४१ उमेदवारी अर्ज दाखल झाले. पंचायत समितीच्या १४६ गणांसाठी १ हजार १६५ अर्ज आले आहेत. इंदापूर तालुक्यातून जिल्हा परिषदेच्या गटांसाठी सर्वाधिक ११४ अर्ज दाखल झाले असून, पंचायत समितीच्या गणांसाठीही इंदापूर तालुक्यातूनच सर्वाधिक २१३ अर्ज आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली असून गुरुवारी झालेल्या छाननीमध्ये किरकोळ अर्ज वगळता प्रमुख उमेदवारांचे अर्ज वैध ठरले. जुन्नर आणि इंदापूरमध्ये प्रत्येकी पंचायत समिती गणातील चार आणि पाच उमेदवारांचे अर्ज बाद झाले. आंबेगाव आणि इंदापूरमध्ये गटात प्रत्येकी एका उमेदवाराचा अर्ज बाद झाला. छाननीनंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी पात्र उमेदवारांची यादी जाहीर केली. मंगळवारी दि. २७ जानेवारी हा उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अखेरचा दिवस आहे.

काही माजी सदस्यांना उमेदवारी देण्यात आली आहे. अजित पवार गटाने इंदापूरमध्ये अभिजित तांबिले, सदस्यांना बारामती प्रमोद काकडे, भोरमध्ये चंद्रकांत बाठे यांना उमेदवारी दिली नाही, तर विवेक वळसे-पाटील, सुनिता शरद बुट्टे-पाटील, शांताराम इंगवले, रणजित शिवतारे, वीरधवल जगदाळे, विक्रम खुटवड, रेखा बांदल, पूजा पाएंगे, यांना उमेदवारी दिली आहे. भाजपकडून आशा बुचके, भाऊ गुंड, बाबूराव वायकर, राजेंद्र गावडे यांना उमेदवारी दिली आहे. काहींना थेट अर्ज दाखल करण्याच्या काही वेळ आधीच एबी फॉर्म दिले गेल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. शिरूरमध्ये इच्छुक उमेदवार, समर्थक व कार्यकर्त्यांची अचानक झालेली गर्दी, धक्काबुक्की आणि गोंधळामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.




### आंबेगावमध्ये ठेकेदार प्रकरणामुळे अर्ज बाद

**» घोडेगाव: आंबेगाव तालुका जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत गटाच्या पाच जागेसाठी २७ तर पंचायत समितीच्या १० जागांसाठी ५८ अर्ज दाखल झाले आहेत घोडेगाव येथे तहसील कार्यालयात या सर्व अर्जांची छाननी करण्यात आली यामध्ये पारगाव गटातील रवींद्र जनार्दन वळसे यांचा अर्ज बाद करण्यात आला संबंधित उमेदवार ठेकेदार असल्याने त्यांचा अर्ज बाद करण्यात आला त्यांच्या अर्जावर हरकतदेखील आली होती बाकी सर्व अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांनी वैध ठरवले. अवसरी खुर्द गणातील नीलेश टेमकर यांच्या अर्जावर जिल्हा परिषदेचे गटनेते देवीदास दरेकर यांनी हरकत घेतली. संबंधित उमेदवार हा ठेकेदार असून त्याचा अर्ज बाद करावा अशी लेखी मागणी त्यांनी केली. मात्र त्यांच्या तक्रारीचा अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी फेटाळला. संबंधित उमेदवाराने अर्ज भरताना तो ठेकेदार नसल्याबाबतचा दाखला जोडला आहे व जर तो खरोखर ठेकेदार असेल तर तक्रारदार यांनी जिल्हा व सत्र न्यायालयात अपील करावे असे सांगत तक्रार अर्ज फेटाळला.**

### दौंडला १७ अर्ज बाद

**» दौंड : दौंडला जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या छाननी प्रक्रियेत १७ अर्ज बाद झाले असल्याची माहिती असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी रेवणनाथ लबडे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, तथा तहसीलदार अरुण शेलार यांनी संयुक्तरीत्या दिली. जिल्हा परिषदेच्या एकूण सात गटात ४ तर १४ गणात १३ अर्ज बाद झाले आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणात एकूण २३४ अर्ज दाखल झाले होते.**

# जि. प. साठी 27, पंचायत समितीसाठी 50 उमेदवारी अर्ज छाननीत ठरले वैध

## निवडणूक निर्णय अधिकारी सुरेंद्र नवले यांची माहिती, 2 अर्ज ठरवले अवैध, काही उमेदवारांच्या अर्जांवर घेण्यात आल्या होत्या

**पुणे | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील ५ गट व १० गणांसाठी १०४ उमेदवारी अर्ज दाखल झाले. छाननीनंतर २ अर्ज अवैध ठरवण्यात आले असून आता जिल्हा परिषदेसाठी २७ तर पंचायत समितीसाठी ५० उमेदवारी अर्ज वैध झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सुरेंद्र नवले व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विक्रम देशमुख यांनी दिली.

पंचायत समितीच्या काले गणातील उद्धवसेनेच्या शहनाज संतोष कुंभार यांचे मतदार यादीत नाव नसल्याने तसेच वराळे गणातील कॉंग्रेसचे शिंदे अनंता बबन यांच्या उमेदवारी अर्जात सूचकाची स्वाक्षरी नसल्याने हे दोन्ही अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अवैध ठरवले.

इंदुरी गटातील भाजपच्या उमेदवार मेघा प्रशांत भागवत यांचे शपथ पत्र अभिसाक्ष नसल्याची हरकत घेतली होती. कुसगाव बुद्रुक गटातील भाजपचे उमेदवार दत्तात्रय शंकर गुंड यांच्या अर्जावर निरंक केल्याने हरकत घेतली होती. सोमाटणे गणातील भाजपचे उमेदवार बाळासाहेब नथु पारखी यांनी गुन्ह्याची माहिती सादर न केल्याची हरकत होती. तसेच सुभाष धामणकर यांच्या अर्जावरही हरकत होती, काले गणातील राष्ट्रवादीच्या उमेदवार शैला रामचंद्र कालेकर त्यांच्यावर घर दाखवलं पण व्हॅल्युएशन न दाखवल्यामुळे हरकत घेतली होती.

कार्ला गणातील उद्धवसेनेच्या उमेदवार अश्विनी अमोल भेगडे किरकोळ हरकत घेतली होती. नाणे गणातील भाजपच्या उमेदवार संगीता ज्ञानेश्वर आढारी यांच्या अर्जावर किरकोळ हरकत घेतली होती. चांदखेड गणातील राष्ट्रवादीच्या उमेदवार सुनीता मनोज येवले यांच्या उमेदवारी अर्जांवर प्रॉपर्टी लपवली, याबाबत हरकत घेण्यात आली होती.

हरकत घेतलेले ८ ही उमेदवारी अर्ज सुनावणीनंतर सर्व हरकती फेटाळण्यात आल्या असून आदेशाद्वारे सर्व उमेदवारी अर्ज वैध ठरवण्यात असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी सुरेंद्र नवले यांनी जाहीर केले.




### ८ हरकती घेतलेले उमेदवारी अर्ज

**» छाननी प्रक्रियेत हरकत घेतलेल्या इंदुरी गटातील भाजपच्या उमेदवार मेघा प्रशांत भागवत यांचे शपथ पत्र अभिसाक्ष नसल्याची हरकत घेतली होती. कुसगाव बुद्रुक गटातील भाजपचे उमेदवार दत्तात्रय शंकर गुंड यांच्या अर्जावर निरंक केल्याने हरकत घेतली होती. सोमाटणे गणातील भाजपचे उमेदवार बाळासाहेब नथु पारखी यांनी गुन्ह्याची माहिती सादर न केल्याची हरकत होती. तसेच सुभाष धामणकर यांच्या अर्जावरही हरकत होती, काले गणातील राष्ट्रवादीच्या उमेदवार शैला रामचंद्र कालेकर त्यांच्यावर घर दाखवलं पण व्हॅल्युएशन न दाखवल्यामुळे हरकत घेतली होती.**